# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/अज/२०१६/2911

दिनांक :- 29 AUG 2016

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित व विना अनुदानित,
पदवीका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणी बाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०१६/११३५ दिनांक २० ऑगष्ट २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये अनसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गाच्या (ST/VJ/NT) या राखीव प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे निर्गमित केलेल्या सबंधित प्राधिकरणाकडे पाठविलेली असता असता त्यापैकी काही विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र बनावट असल्याबाबतचा अहवाल सबंधित प्राधिकरणाकडुन प्राप्त झालेला आहे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये वरील प्रवर्गातील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे निर्गमित केलेल्या सबंधित प्राधिकरणाकडे पाठवुन त्याबाबतची सत्यता पडताळणी करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच वरील प्रवर्गातील अशा प्रकरणी किती प्रकरणे बनावट आढळलेली आहे, याबाबतचा अहवाल सुध्दा या कार्यालयास सादर करावा.

तसेच आपणास कळविण्यात येते की, अनसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गाच्या (ST/VJ/NT) या राखीव प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांने दरम्यानचे कालावधीत स्वतःहुन प्रवेश रद्द केल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश संस्था स्तरावर रद्द करावा. मात्र सबंधित विद्यार्थ्याला ज्या प्रवर्गात प्रवेश मिळालेला आहे त्या प्रवर्गाचे प्रमाणपत्र उदा. जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र व्यतिरीक्त इतर प्रमाणपत्र विद्यार्थ्यास परत करण्यात यावेत. व सदर प्रमाणपत्र निर्गमित करणा-या प्राधिकरणाकडे प्रमाणपत्राची सत्याता पडताळणीसाठी पाठविण्यात यावी. अशा प्रवेश रद्द केलेल्या प्रकरणांची स्वतंत्र विवरणपत्रात माहीती आपल्याकडे जतन करण्यात यावी. तसेच सदर प्रमाणपत्र या कार्यालयाच्या सुचनेनुसार पुढील कार्यवाहीसाठी संस्थेत ठेवण्यात आले असुन प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या प्राधिकरणाकडुन पडताळणी झाल्यानंतर सदर प्रणाणपत्रे परत करण्यात येईल, अश्या आशयाचे लेखी पत्र तसेच सदर

# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रती सबंधित विद्यार्थ्यास देण्यात यावी. तसेच प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळुन आल्यास सबंधित विद्यार्थ्यावर आपल्या स्तरावर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रमाणे सबंधित प्राधिकरणाकडुन प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी तात्काळ करण्यात यावी व त्याबाबतचा पाठपुरावा करुन प्रगतीचा आढावा या कार्यालयास दिनांक २३/९/२०१६ पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावा. जेणेकरुन सदर अहव ाल तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना पुढील कार्यवाहीकरीता पाठविणे शक्य होईल.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.